I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154140

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( **Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., मुं. पहिली खबर क्र. FIR No. ३२, वर्ष Year २०२१, दिनांक Date ०२/०८/२०२१

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधिनियम १९८८, कलमे Sections ७, १२
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलने Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शनिवार, तारीख पासून Date from ३१/७/२०२१ वेळ Time ११.२४ वा, तारीख पर्यंत Date to २/८/२०२१ वेळ Time ११.३०

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ३०/०७/२०२१, वेळ Time १६.०० वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ५६/२०२१, तारीख Date २/८/२०२१ वेळ Time २०.३४ वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ५ कि.मी. पश्चिम, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name क्रमांक नं.२८, जलकामे विभाग, 'ई' वार्ड, म.न.पा. भायखळा, मुं-४०000८, ठिकाणाचे नंबर No. if any ..., गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road ...

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name अश्रफ खान (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name शेर खान

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३५ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ८६५२२११००३

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..., दिल्याचा दिनांक Date of Issue ..., दिल्याचे ठिकाण Place of Issue ... (f) व्यवसाय Occupation ...

   (g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste ..., जनजात Sub-Caste ...

   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No. — ७०९, राजश्री बंकर, तेली गल्ली, अंधेरी (पू) मुं-४०००६९

   रस्त्याचे नाव Road ..., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., पो. स्टे. P. Stn. ...

   तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ... राज्य State ... सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.) १) सचिन गणपत खोडदे (दुय्यम अभियंता) जलकामे विभाग 'ई' वार्ड, म.न.पा. भायखळा, मुं-०८ राहि. बि.क्र. ८ ओ/७, शरद सोसायटी, कामगार नगर, कुर्ला (प) मुं-२४ (२) विश्वंभर प्रल्हादराव शिंदे (कनिष्ठ अभियंता) जलकामे विभाग 'ई' वार्ड, म.न.पा. भायखळा, मुं-०८ राही. बी/१०६, खान मिल म्हाडा बिल्डिंग, [illegible] रोड, शिवडी मुं-४०००१५



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी अश्रफ शेर खान यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखित करण्यात आली असुन ती प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावी.

समक्ष

प्रदिप देवकर
पोलीस निरिक्षक
गा.गु.वि. मुंबई

(अश्रफ शेर खान)

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दि. ०२/०८/२०२१

श्री. अश्रफ शेर खान, वय ३५ वर्ष, धंदा– प्लंबिंग व्यवसाय, रा.ठी.– ७०१, राजेश्री ॲकॉर्ड, तेली गल्ली, अंधेरी पुर्व, मुंबई ४०० ०६९, मो. क्रं. ८६५२२११००३

-----•-----

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर माझे कुटूंबासह रहावयास आहे. माझेकडे प्लंबींग काम करण्यासाठी परवाना नसल्यामुळे मी परवानाधारक प्लंबर यांच्या अधिकारपत्रावर (ॲथॉरीटी लेटर) अंडर लायसन्स प्लंबर म्हणुन काम करीत असतो व त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

बृहन्मुंबई महानगरपालीकेच्या वॉर्ड अंतर्गत येणाऱ्या रहिवाशांना पाण्याच्या नळाचे नवीन कनेक्शन घ्यावयाचे असल्यास संबंधीत रहिवाशी हे परवानाधारक प्लंबर यांचेशी संपर्क करतात. त्यानंतर संबंधीत रजिस्टर्ड परवानाधारक प्लंबर हे अधिकारपत्र (ॲथॉरीटी लेटर) देऊन संबंधीत फाईलचा बृहन्मुंबई महानगर पालीकेच्या जलकामे विभागाकडून पाठपुरावा करून मंजूर करून घेण्यासाठी माझ्यासारख्या अंडर लायसन्स प्लंबरची नियुक्ती करतात.

माझेकडे परवाना नसल्याने मी श्री. नितीन दराडे यांच्याकडे प्लंबींगचे काम करीत असुन त्यांनी मला अधिकारपत्र (ॲथॉरीटी लेटर) लेटर दिले आहे. माझेकडे क्वेटावाला रेसीडेंसीचे सेक्रेटरी श्री. झैनुद्दीन क्वेटावाला पत्ता– क्वेटावाला रेसीडेंसी, प्लॉट बेअरींग सी.एस. क्र. ४/१६५९, भायखळा डिव्हिजन, प्लॉट क्र. ५८, मोरलॅंड रोड, आग्रीपाडा, भायखळा पश्चिम, मुंबई – ४०० ००८ यांचे सोसायटीचे नविन पाण्याचे कनेक्शन करीता केलेल्या अर्जाची मी जलकामे विभाग, ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई येथील दुय्यम अभियंता (ज्युनिअर इंजिनीअर) विश्वंभर शिंदे यांच्याकडे दि. २८/०७/२०२१ रोजी चौकशी करण्याकरीता गेलो असता त्यांनी माझेकडे रू. २,००,०००/– रूपये इतक्या लाचेची मागणी केली व त्यानंतरच तुमची फाईलबाबत पुर्तता करण्यात येईल असे मला सांगितले व दि. ३१/०७/२०२१ रोजी मला पुन्हा जलकामे विभाग, ई वॉर्ड, बुहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई येथील कार्यालयात बोलाविले.

जलकामे विभाग, ई वॉर्ड, बुहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई येथील कार्यालयातील विश्वंभर शिंदे यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक ३०/०७/२०२१ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि मुंबई कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. देवकर यांना भेटलो असता त्यांनी जलकामे विभाग, ई वॉर्ड, बुहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई या कार्यालयातील ज्युनिअर इंजिनीअर विश्वंभर शिंदे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले मला व्यवस्थित लिहिता येत नसल्याने माझे सांगण्याप्रमाणे माझा मित्र श्री. झाहिद वसीअल्लाह शेख याच्याकडून मी माझा लेखी तक्रार अर्ज हिंदी भाषेमध्ये लिहून घेतला व तो वाचून पाहिला. त्यानंतर पो.नि. देवकर यांनी माझी त्यावर सही घेतली. पो.नि. देवकर यांनी माझे अर्जावर दिनांक ३१/०३/२०२१ रोजी कारवाई करण्यात येईल असे सांगुन मला दिनांक ३१/०७/२०२१ रोजी लाप्रवि कार्यालयात सकाळी १०.०० वाजता येण्यास सांगितले.

पो.नि. देवकर यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. ३१/०७/२०२१ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायातील चौथ्या मजल्यावरील कक्ष क्र. ४०६ मध्ये सकाळी १०.०० वाजता हजर झालो. सदर ठिकाणी पो.नि. देवकर यांचेसोबत उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांशी व सपोआ परब, पो.नि. लवांडे यांचेशी आणि उर्वरीत पोलीस पथकाशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. देवकर यांनी पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक ३०/०७/२०२१ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि.

Scanned with OKEN Scanner

देवकर यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. देवकर यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि देवकर यांनी दिनांक ३१/०७/२०२१ रोजी पंचांसमक्ष बृहन्मुंबई महानगरपालिका, 'ई वॉर्ड, भायखळा, मुंबई येथील कार्यालयाच्या ठिकाणी माझे तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन लोकसेवका सोबत होणारे संभाषण पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पडताळणी पंचनाम्यासाठी आवश्यक बाबींची पुर्तता करून सपोआ. परब, पोनि देवकर, पोनि लवांडे, पोना मठपती व एक शासकिय पंच ला.प्र.वि. कार्यालयातून शासकिय वाहनाने व त्या शासकिय वाहनाच्या मागे मी एका पंचासह माझी टिव्हिएस मोटर स्कुटर क्र. एम.एच.४७ ए. आर. ०१६५ यावर निघून डोसा कंपाऊंड, सातरस्ता, मुंबई येथे थांबलो व उर्वरीत पोलीस पथक हे लाप्रवि कार्यालयात थांबून राहिले. त्यानंतर पो.नि.देवकर यांनी मला ज्युनिअर इंजिनियर विश्वंभर शिंदे यांना भेटण्याकरीता जलकामे विभाग, ई वॉर्ड, बुहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई येथील कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. उके यांचेसह माझी टिव्हिएस मोटर स्कुटर क्र. एम.एच.४७ ए. आर. ०१६५ यावर पाठविले. मी पंचासोबत ई वॉर्ड येथील दुसऱ्या मजल्यावरील रूम क्र. १९ मध्ये गेलो असता ज्युनिअर इंजिनियर विश्वंभर शिंदे तेथे उपस्थित नसल्याने सब इंजिनिअर सचिन खोडदे यांना भेटून त्यांच्याबाबत विचारणा केली असता त्यांनी विश्वंभर शिंदे यांना फोन करण्यास सांगितले. त्यावेळी मी पंच श्री. उके यांच्यासमक्ष ज्युनिअर इंजिनियर विश्वंभर शिंदे यांना स्पिकर चालू करून फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही. थोडयावेळांनतर पुन्हा त्यांना फोन केला असता त्यांनी ते बाहेर असल्याने थोडया वेळाने येण्यास मला सांगितले. त्यानंतर मी पुन्हा ज्या ठिकाणी पोलीस वाहन पार्क केले होते त्याठिकाणी पंचासह परत आलो. सुमारे अर्ध्या तासानंतर पो.नि. देवकर यांनी डिजीटल रेकॉर्डर चालू करून मला पंचासह माझे मोटर स्कुटर वर ज्युनिअर इंजिनियर विश्वंभर शिंदे यांच्याकडे पाठविले. त्यावेळी माझी ज्युनिअर इंजिनियर विश्वंभर शिंदे यांच्याशी भेट झाली व त्यांचेशी कामासंदर्भात चर्चा झाली. ज्युनिअर इंजिनियर विश्वंभर शिंदे यांनी मला त्यांना स्वत:ला व त्यांचे वरिष्ठ अधिकारी सचिन खोडदे असे दोघांचे मिळून माझेकडे माझे काम करण्याकरीता व फाईल पुढे पाठविण्याकरीता रू. २,००,०००/– रूपयांची मागणी केली असता मी माझेकडे इतके पैसे नसुन रूपये १,७०,०००/– इतकी रक्कम देऊ शकतो असे सांगितले असता ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांनी सोमवारी दिनांक ०२/०८/२०२१ रोजी सकाळी मला वरिष्ठ अधिकारी सचिन खोडदे यांच्याशी तुझी भेट करून देतो असे सांगितले व टोकन म्हणून मला सोबत रू.१,००,०००/– रक्कम घेऊन येण्यास सांगितले.

त्यानंतर ज्या ठिकाणी पोलीस वाहन पार्क केले होते त्याठिकाणी पंचासह परत आलो. पो.नि. देवकर यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत मला व पंच श्री. उके यांना विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. ज्युनिअर इंजिनियर विश्वंभर शिंदे याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लाचेच्या रक्कमेपैकी टोकन म्हणुन रू. १,००,०००/– रक्कम घेवुन दि. ०२/०८/२०२१ रोजी येण्यास सांगितले. पो.नि. देवकर यांनी अन्य लोकसेवक सब इंजिनीअर सचिन खोडदे यांची सुध्दा पडताळणी करावयाची बाकी असल्याने व लाचेच्या रक्कमेचे टोकण म्हणुन रू. १,००,०००/– रक्कम देण्याबाबत सापळा कारवाई होणार असल्याने आवश्यक त्या सुचना देऊन मला घरी जाण्यास सांगितले व लाचेच्या मागणीप्रमाणे मला रू. १,००,०००/– ची व्यवस्था करून दि. ०२/०८/२०२१ रोजी लाप्रवि कार्यालयास येण्यास सांगितले.

मी दिनांक ०२/०८/२०२१ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालयात चौथ्या मजल्यावरील कक्ष क्र. ४०६ येथे सकाळी ०९.३० वाजता हजर झालो त्यावेळी तेथे दोन पंच व उर्वरीत पोलीस पथक हजर होते. पो.नि. देवकर यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी त्यांना माझेकडे रू.

Scanned with OKEN Scanner

५०,०००/— असल्याचे सांगितले असता पो.नि. देवकर यांनी मला उर्वरीत रू. ५०,०००/— हे खेळण्यातील नोटा लाचेच्या रक्कमेकरीता वापरत असल्याचे मला पंचासमक्ष सांगितले. त्यानंतर पो.नि. देवकर यांनी आज रोजी पुन्हा पडताळणी व सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मला ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात नेऊन माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ५०,०००/— (रू. ५००/— दराच्या १०० भारतीय चलनी नोटा ) ताब्यात घेतल्या. त्यानंतर नमुद नोटांचे क्रमांक नोंद करून त्या नोटांच्या छायांकित प्रती लाप्रवि कार्यालयाच्या झेरॉक्स मशिनवर काढुन घेतल्या. त्यानंतर नमुद नोटांमध्ये रूपये ५०० दराच्या खेळण्यातील १०० नोटा असे रू.५०,०००/— रक्कमेची दोन बंडल अशी एकूण रू.१,००,०००/— ही लाचेची रक्कम तयार केली. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच पोनि देवकर यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर. मला माझा उजव्या हाताने कान खाली खेचण्याचा पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे दुसऱ्या मजल्यावरील रूम क्र.१९च्या बाहेर थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व नमुद दोन्ही नोटांचे बंडल मी माझ्या नेसणीस असलेल्या जीन्स पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवले आणि पोलीस पथक व पंचांसह सापळा कारवाईकरीता ब्युरो कार्यालयातून शासकिय वाहनाने निघुन भायखळा रेल्वे कॉलनी, भायखळा मुंबई येथे आलो. त्यावेळी पो.नि. देवकर यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. उके यांच्यासह ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांचे जलकामे विभाग, ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई येथील कार्यालयात पाठविले व माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून आले.

मी ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांना भेटण्यास रूम क्र. १९ मध्ये गेलो असता त्या ठिकाणी ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांच्या केबिनमध्ये इतर लोक उपस्थित असल्याने मी पंच श्री. उके यांना हाताने केबीन बाहेर थांबण्याचा इशारा केला. मी ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांना भेटलो असता त्यांनी मला सब इंजिनिअर सचिन खोडदे यांना भेटण्यास सांगितले. त्यावेळी मी सब इंजिनिअर सचिन खोडदे यांना भेटलो व त्यांना '' शिंदे साहब से बात हुआ है... वो दो लाख बोलते है मै एक सत्तर बोला... एक लाख सत्तर हजार... ठिक है न साहब..'' त्यावेळी सब इंजिनिअर सचिन खोडदे यांनी मला ''बोला है ना करने के लिए.... बराबर करेगा वो ठिक...बनाके देगा..'' असे सांगितले. त्यानंतर मी सब इंजिनिअर सचिन खोडदे यांना सांगितले की, मी शनिवारी ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांना भेटलो असता त्यांनी अॅडव्हान्स म्हणुन रू.१,००,०००/— रक्कम घेऊन येण्यास व सब इंजिनिअर सचिन खोडदे यांची भेट घेऊन त्यांना रक्कमेबाबत कळविण्यात यावे असे मला बोलेले होते. त्यानंतर सब इजिनिअर सचिन खोडदे यांनी मला नमुद रक्कमेबाबत ''बात उनसे हि कर लो ना..'' असे सांगुन मला ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांचेकडे पाठविले.

त्यानंतर मी ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांचेकडे गेलो असता सब इंजिनिअर सचिन खोडदे यांच्यासोबत झालेल्या बोलण्याबाबत माहिती दिली. त्यानंतर ज्युनिअर इंजिनिअर त्यांच्या केबिनमधुन उठून सब इंजिनिअर सचिन खोडदे यांच्याकडे गेले व काहि वेळाने माघारी येऊन मला सांगितले की, साहेबांबरोबर बोलणे झाले आहे व त्यांनी नमुद कामाबाबत रू.२,५०,०००/— इतकी रक्कम दयावी लागेल असे सांगितले. त्यानंतर मला टोकण रक्कम देण्याबाबत सांगितले असता मी माझे नेसणीस असलेल्या पॅन्टच्या उजव्या खिश्यातील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १,००,०००/— (रू. ५००/— दराच्या १०० भारतीय चलनी नोटा व ५०० दराच्या १०० खेळण्यातील नोटा असे प्रत्येकी १०० नोटांचे दोन बंडल ) हे उजव्या हाताने काढुन ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांच्या उजव्या हातात दिले व त्यांनी ते त्यांच्या टेबलच्या उजव्या बाजुस असलेल्या ड्रॉवरमध्ये ठेवले. त्यानंतर मी रूम क्र. १९ च्या बाहेर येऊन तेथे थांबलेल्या पोलीस पथकास पुर्वनियोजित असा

उजव्या हाताने कान खाली खेचून इशारा केला त्यावेळी लागलीच पोलीस पथकाने ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे व सब इंजिनिअर सचिन खोडदे यांस ताब्यात घेतले. लोकसेवक ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांच्या टेबलाच्या ड्रॉवर मधुन ताब्यात घेण्यात आलेल्या नोटा व माझे सोबत देण्यात आलेल्या नोटांचे क्रमांक हे एकच असल्याचे पंचांसमक्ष खात्री करण्यात आली.

त्यानंतर पोनि देवकर यांचे सुचनेप्रमाणे सदर ठिकाणी कृत्रीम अंधार करून पंचांनी माझी अंगझडती घेऊन माझ्या सामानाची दिव्याखाली तपासणी करून माझे सामान परत दिले तसेच लोकसेवक श्री. शिंदे यांच्या हातांची, ड्रॉव्हर व कपडयांची अल्ट्राव्हॉयलेट दिव्याखाली तपासणी केली असता त्यांच्या उजव्या हातावर फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली, त्यांच्या नेसणीस असलेल्या निळया रंगाच्या जिन्स पॅन्टच्या उजव्या बाजुस व त्यांच्या ड्रॉव्हरच्या आतील बाजुस फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेण्यात आली. त्यानंतर मी, दोन पंच, सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी व लोकसेवक ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे व सब इंजिनिअर सचिन खोडदे असे आम्ही सर्व शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालय, वरळी येथे आलो. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

जलकामे विभाग, ई वॉर्ड, बुहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई येथील कार्यालयातील ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे व सब इंजिनिअर सचिन खोडदे यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

तरी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ई वॉर्ड, भायखळा, मुंबई येथील जलकामे विभागातील ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर प्रल्हादराव शिंदे यांनी यांनी क्वेटावाला रेसीडेंसीचे सेक्रेटरी, श्री. झैनुद्दीन क्वेटावाला, क्वेटावाला रेसीडेंसी, प्लॉट बेअरींग सी.एस. क्र. ४/१६५९, भायखळा डिव्हिजन, प्लॉट क्र. ५८, मोरलॅंड रोड, आग्रीपाडा, भायखळा पश्चिम, मुंबई – ४०० ००८ यांच्या नवीन नळ जोडणीचे प्रलंबित असलेल्या अर्ज मंजूर करून पी फॉर्म देण्याकरीता दिनांक ३१/०७/२०२१ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी मध्ये माझेकडे स्वत:साठी व त्यांचे वरिष्ठ अधिकारी दुय्यम अभियंता सचिन गणपत खोडदे यांच्यासाठी रू.२,००,०००/– रक्कमेची मागणी करून आणि दिनांक ०२/०८/२०२१ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी मध्ये माझेकडे स्वत:साठी व त्यांचे वरिष्ठ अधिकारी दुय्यम अभियंता सचिन गणपत खोडदे यांच्यासाठी रू.२,५०,०००/– रक्कमेची मागणी करून फाईल पुढे पाठविण्यासाठी तडजोडीअंती पहिला हप्ता म्हणुन रू. १,००,०००/– इतक्या रक्कमेची लाचेची मागणी करून नमुद लाच रक्कम स्विकारली आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी दुय्यम अभियंता सचिन गणपत खोडदे यांनी नमुद लाचेबाबत ज्युनिअर इंजिनिअर विश्वंभर शिंदे यांच्यासोबत बोलणी करण्यास सांगुन त्यांना अपप्रेरणा दिली म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला मराठीतुन वाचून हिंदीतून समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( प्रदिप देवकर ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page
..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

वरील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांच्याकडे नळजोडणी संदर्भात फाईल मंजुर करण्यासाठी अटक आरोपी लोकसेवक क्र.२ यांनी स्वत:साठी व आरोपी लोकसेवक क्र.१ यांच्यासाठी दि.२७/०७/२०२१ रोजी रु.३,००,०००/- व दि.०४/८/२०२१ रोजी रु.२,५०,०००/- इतक्या रकमेची लाचेची मागणी करुन त्यापैकी रु.१,००,०००/- रक्कम स्विकारले. तसेच आरोपी लोकसेवक क्र.१ यांनी नमुद लाचेची रक्कम स्विकारणेबाबत आरोपी लोकसेवक क्र.२ यांना अपप्रेरणा दिल्याने भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, १२ अन्वये गुन्हा केला म्हणुन नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन.........., जिल्हा.........., राज्य..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name प्रदिप देवकर
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुं.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ..........

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner